४७.

# मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचातुलनात्मक अभ्यास

प्रा. एस.ए. सांगळे
जवाहर महाविद्यालय, अंदूर

**०.१ प्रस्तावना:** भारताला कधी काळीसोन्याचा धूर निघणारा देश म्हटलेजायचे. आज हा भारत शेतीप्रधान देश आहे. या देशात एक म्हण फार प्रचलित होती. "उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी" मात्र आज उलट आहे. आत म्हटले जाते "उत्तम नोकरी, मध्यम व्यापार, कनिष्ठ शेती" सर्वांना जगण्यासाठी अन्न लागते आणि अन्नदात्या शेतकऱ्यांची अन्नान्न दशाहोत आहे. शेतकरी आज मोठया प्रमाणावर आत्महत्या करत आहे.

शेतकऱ्यांच्या कर्जबाजारी पणाच्या तज्ञ गटाकडून अभ्यास करण्यात आलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने प्रा. राधाकृष्ण एस.एस.स्वामीनाथन, डॉ. नरेंद्र जाधव, पी. साईनाथ या तज्ञा बरोबरच टाटा इन्स्टंट ऑफसोशल सायन्स (टिस) इंदिरा गांधी विकास संशोधन संस्था या वेगवेगळया विभागातील संस्थानी भारत, महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा या वेगवेगहया विभागातील जल शेतकऱ्यांच्या आत्महत्याच्या कारणाचा अभ्यास करुन तत्कालीनसरकारला अहवाल सादर केलेले आहेत.

त्या वेळचे सरकार चालवणाऱ्या राज्य कर्त्यांनी आपला स्वार्थ समोर घेऊनच शेतकऱ्यांना मदत करण्याचे प्रयत्न केले दिसून येतात. शेतकऱ्यांना वेगवेगळी पॅकेजेस दिली गेली. उपाय योजना केलेल्या दिसत नाहीत.

महाराष्ट्र आणि संबंध देशातील कृषीक्षेत्र धोक्यात आल्याची तीव्रता शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न एरणीवर आल्यानेहयासमस्येचे आकलन, दाहकता लक्षात घेऊनत्याची उकल करण्यासाठी शासकीय बीगर शासकीय पातळीवर प्रयत्न होण आवश्यक आहे. भारत हा कृषीप्रधान देश आहे. कृषी प्रधान देशातील शेतकऱ्यांचीहालाखीची आर्थिकस्थिती आणि देशात महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या वाढत चाललेल्या आत्महत्याही बाब अत्यंत चिंतनिय आहे. महाराष्ट्रात मराठवाडयात याचे प्रमाण खुप दिसते.

भारतामध्ये ६५% लोक शेती व शेतीशी संबंधीत व्यवसायात गुंतलेले आहेत. अने उद्योगाची जननी कृषी आहे. परंतु पंचवार्षिक योजना मध्ये शेती क्षेत्राकडेलक्ष दिले गेलेत्यापेक्षा जास्त लक्ष द्यायला पाहिजेहोते. भारतातील ६०% लोक कृषी क्षेत्रात असलेतरी या क्षेत्रातील राष्ट्रीय उत्पन्नात २५% योगदान आहे. विकसीत राष्ट्रांमध्ये कृषी क्षेत्रावर अवलंबून फारच कमी आहे. अमेरीकेत २% लोक शेतीवर अवलंबून आहेत. त्यांचे उत्पन्न ४% आहे.

**०.२ उदिष्टये :-**

आत्महत्या करण्यास प्रवृत्त होणाऱ्या घटकाची माहिती करुन घेणे.

शासकीय धोरणांचा किंवा योजनाच्या शेतकऱ्यांवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.

आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या समस्येवर उपाय सुचवणे.

**०.३ संशोधन पध्दती :-**

उपलब्ध पुस्तके, दैनिके, मासिके व इंटरनेट वरुन द्वितीयक माहिती जमा करुन पेपर लिहला आहे.

**०.४विश्लेषण :-**

भारतातील शेतकऱ्याच्या आत्महत्याच्या तुलनेत महाराष्ट्रातील शेतीचा विचार करता असे दिसून येते की, भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचीसरासरी १५४७१.४ ऐवढी दिसून येते. तर महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्याची ३१५५.६ ऐवढी सरासरी दिसून येते. २० वर्षाच्या काळात शेतकऱ्यांच्या आत्महत्याचा विचार केल्यास असे दिसून येते की २०१६ मध्ये २६% आत्महत्या महाराष्ट्रात झालेल्या दिसून येतात.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

**तक्ता क्र. ४ महाराष्ट्रात जिल्हा निहाय शेतकऱ्याच्या आत्महत्या**

| अ.क्रं | जिल्हा | संख्या | टक्केवारी | अ.क्रं | जिल्हा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | १२ | ०.१ | १८ | परभणी | १८० | १.४ |
| २ | रायगड | ० | ० | १९ | नांदेड | ३८९ | ३.१ |
| ३ | रत्नागिरी | ० | ० | २० | उस्मानाबाद | २३४ | १.९ |
| ४ | सिंधूदुर्ग | ० | ० | २१ | लातूर | ८८ | ०.७ |
| ५ | पुणे | ८८ | ०.७ | २२ | हिंगोली | ७६ | ०.६ |
| ६ | सातारा | १७० | १.४ | २३ | नभपूर | ४०३ | ३.२ |
| ७ | सांगली | १४४ | १.१ | २४ | वर्धा | ७८९ | ६.३ |
| ८ | सोलापूर | १०९ | ०.९ | २५ | चंद्रपूर | ३२३ | २.६ |
| ९ | कोल्हापूर | ७४ | ०.६ | २६ | गडचिरोली | ५९ | ०.५ |
| १० | नाशिक | १९५ | १.५ | २७ | भंडारा | २८० | २.२ |
| ११ | धुळे | २३३ | १.९ | २८ | गोंदिया | ११३ | ०.९ |
| १२ | जळगांव | ४८७ | ३.९ | २९ | अमरावती | १७९८ | १४.३ |
| १३ | नागपूर | १४ | ०.१ | ३० | अकोला | १०७९ | ८.६ |
| १४ | अहमदनगर | १११ | ०.९ | ३१ | बुलढाणा | १२१२ | ९.६ |
| १५ | औरंगाबाद | ९८ | ०.१ | ३२ | यवतमाळ | २२८९ | १८.२ |
| १६ | जालना | १२३ | १.० | ३३ | वाशिम | ८९६ | ७.१ |
| १७ | बीड | ५२५ | ४.२ | ३४ | महाराष्ट्र | १२५९१ | १०० |

**Source** :-Secter officer Dept. of management New Administrative building government & Maharashtra, Mumbai. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या तुलनेत मराठवाडयात आत्महत्या ग्रस्त शेतकरी प्रतिशत प्रमाणात विचार केल्यास असे दिसून येते की बीड जिल्हयात ४.२ % च्या खालोखाल नांदेड ३.१ % प्रमाण दिसून येते. परभणी जिल्हयात १.४ % तसेच जालना जिल्हयात १.०% असे प्रमाण दिसून येते.

**मराठवाडयात ९० दिवसात २१६ शेतकऱ्याच्या आत्महत्या पुढीलप्रमाणे तक्ता क्रं. २ मध्ये दर्शविल्या आहेत.**

**तक्ता क्रं. २**

**मराठवाडा विभागातील शेतकरी आत्महत्येची प्रकरणे**

| अ.क्र. | जिल्हा | एकूण प्रकरणे | पात्र | अपात्र | प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद | ३० | १३ | ०८ | ०९ |
| २ | जालना | २१ | २० | ०० | ०१ |
| ३ | परभणी | २४ | ०९ | ०३ | १२ |
| ४ | हिंगोली | १४ | ०६ | ०१ | ०७ |
| ५ | नांदेड | ३८ | २४ | ०४ | १० |
| ६ | बीड | ४० | ३२ | ०२ | ०६ |
| ७ | लातूर | १२ | ०२ | ०१ | ०९ |
| ८ | उस्मानाबाद | ३७ | २० | १० | ०७ |
| | **एकूण** | **२१६** | **१२६** | **२९** | **६१** |

**Source** :- दिव्य मराठी मराठवाडा अंक २०१७.

बीड जिल्हयात संबंधित [illegible] आत्महत्या झाल्या आहेत कागदपत्राच्या त्रुटीमुळे ६१ प्रकरणे प्रलंबित. २९ प्रकरणे अपात्र, १२६ प्रकरणे पात्र समितीने ठेवलेली आहेत. याची कारणे १) २ ते ३ वर्षात कमी पर्जन्यमान होत आहे. २) अपेक्षीत



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

तक्ता क्र. ४ महाराष्ट्रात जिल्हा निहाय शेतकऱ्याच्या आत्महत्या

| अ.क्रं | जिल्हा | संख्या | टक्केवारी | अ.क्रं | जिल्हा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | १२ | ०.१ | १८ | परभणी | १८० | १.४ |
| २ | रायगड | ० | ० | १९ | नांदेड | ३८९ | ३.१ |
| ३ | रत्नागिरी | ० | ० | २० | उस्मानाबाद | २३४ | १.९ |
| ४ | सिंधूदुर्ग | ० | ० | २१ | लातूर | ८८ | ०.७ |
| ५ | पुणे | ८८ | ०.७ | २२ | हिंगोली | ७६ | ०.६ |
| ६ | सातारा | १७० | १.४ | २३ | नभपूर | ४०३ | ३.२ |
| ७ | सांगली | १४४ | १.१ | २४ | वर्धा | ७८९ | ६.३ |
| ८ | सोलापूर | १०९ | ०.९ | २५ | चंद्रपूर | ३२३ | २.६ |
| ९ | कोल्हापूर | ७४ | ०.६ | २६ | गडचिरोली | ५९ | ०.५ |
| १० | नाशिक | १९५ | १.५ | २७ | भंडारा | २८० | २.२ |
| ११ | धुळे | २३३ | १.९ | २८ | गोंदिया | ११३ | ०.९ |
| १२ | जळगांव | ४८७ | ३.९ | २९ | अमरावती | १७९८ | १४.३ |
| १३ | नागपूर | १४ | ०.१ | ३० | अकोला | १०७९ | ८.६ |
| १४ | अहमदनगर | १११ | ०.९ | ३१ | बुलढाणा | १२१२ | ९.६ |
| १५ | औरंगाबाद | ९८ | ०.१ | ३२ | यवतमाळ | २२८९ | १८.२ |
| १६ | जालना | १२३ | १.० | ३३ | वाशिम | ८९६ | ७.१ |
| १७ | बीड | ५२५ | ४.२ | ३४ | महाराष्ट्र | १२५९१ | १०० |

**Source** :-Secter officer Dept. of management New Administrative building government & Maharashtra, Mumbai. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या तुलनेत मराठवाडयात आत्महत्या ग्रस्त शेतकरी प्रतिशत प्रमाणात विचार केल्यास असे दिसून येते की बीड जिल्हयात ४.२ % च्या खालोखाल नांदेड ३.१ % प्रमाण दिसून येते. परभणी जिल्हयात १.४ % तसेच जालना जिल्हयात १.०% असे प्रमाण दिसून येते.

**मराठवाडयात ९० दिवसात २१६ शेतकऱ्याच्या आत्महत्या पुढीलप्रमाणे तक्ता क्रं. २ मध्ये दर्शविल्या आहेत.**

**तक्ता क्रं. २**

**मराठवाडा विभागातील शेतकरी आत्महत्येची प्रकरणे**

| अ.क्र. | जिल्हा | एकूण प्रकरणे | पात्र | अपात्र | प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद | ३० | १३ | ०८ | ०९ |
| २ | जालना | २१ | २० | ०० | ०१ |
| ३ | परभणी | २४ | ०९ | ०३ | १२ |
| ४ | हिंगोली | १४ | ०६ | ०१ | ०७ |
| ५ | नांदेड | ३८ | २४ | ०४ | १० |
| ६ | बीड | ४० | ३२ | ०२ | ०६ |
| ७ | लातूर | १२ | ०२ | ०१ | ०९ |
| ८ | उस्मानाबाद | ३७ | २० | १० | ०७ |
| | **एकूण** | **२१६** | **१२६** | **२९** | **६१** |

Source :- दिव्य मराठी मराठवाडा अंक २०१७.

बीड जिल्हयात सर्वाधिक ४० आत्महत्या झाल्या आहेत कागदपत्राच्या तृटीमुळे ६१ प्रकरणे प्रलंबित, २९ प्रकरणे अपात्र, १२६ प्रकरणे पात्र समितीने ठेवलेली आहेत. याची कारणे १) २ ते ३ वर्षात कमी पर्जन्यमान होत आहे २) अपेक्षीत

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College, Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

उत्पन्न होत नाही. ३) नापीक मुळे शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा डोंगर वाढत आहे. यामुळे नांदेड ३८ उस्मानाबाद ३७, औरंगाबाद ३० जिल्हयात शेतकऱ्यांची जीवन यांत्रा संपलेली आहे.

२१६ पैकी १२६ प्रकरणेच अनुदानास पात्र ठरवलेली आहेत. २९ अपात्र केली आहेत. ६१ प्रकरणे प्रलंबित ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.शेतकऱ्यांची संख्या कमीहोत चालली आहेतरीशेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत जाताना दिसत आहेत.

मराठवाडयातील शेतकरी एका दुष्टचक्रात अडकला जातोतो नगदी पीकाचे उत्पादन घेतो. उदा. कापूस, मोसंबी, ऊस इ. अशा पीकाच्या लागवडीसाठी बँकेकडून कर्ज घेता. उत्पादन चांगलेझाले नाहीतर शेतकरी बँकेचे हप्ते भरु शकत नाही. दुसऱ्या वर्षी खाजगी सावकाराकडून कर्ज काढून पेरणी करावी लागते. पीक चांगले आले आणि उत्पादन वाढले तरीतो फेडरेसनला कपाशी विकत नाही. कारण फेडरेशनवाले बँकेच्या थकीत कर्जाची प्रथम वसुली करुन मग उवरीत रक्कम चेकने शेतकऱ्यांना देतात. खाजगी सावकाराचे पैसे कर्ज देण्यासाठी शेतकरी कमीकिंमतीत व्यापाऱ्यांना शेतमाल विकतात व बँकेचे कर्जतरोच शेतकऱ्यांच्या डोक्यावर रहाते. जोपर्यंत शेतकरी फेडरेशनला कापूस देत नाहीतोपर्यंत त्याला थोडा जास्त पैसे मिळाल्या शिवाय तो बँकेचे हप्ते फेडू शकनार नाही किंवा दैनंदिन गरजासाठी पूर्ततेसाठी पैसा वापरु शकनार नाही.

शेती उत्पादन घटकांच्या वाढत्या खर्चासोबत शिक्षण, आरोग्य इ. खर्च वाढलेला आहे. आत्महत्या वाढल्याचे सांगता येईल. शेतीमधील उत्पादन खर्च वाढत चालला आहे आणि उत्पन्न काही वाढत नाही. उत्पन्न घटत चालेले दिसते. ज्या एका एकरात दोनहजार रुपये एकरी खर्च लागवड किंवा पेरणीसाठी यायचा तिथे सध्या तीन पट खर्च वाढला. पण उत्पन्न त्या प्रमाणात वाढलेले नाही.

जागतिकीकरणाच्या नावावर आपल्याकडे प्रत्येक महत्वपूर्ण गोष्टीचे खाजगीकरणहोत आहे. या खाजगीकरणात मोठे उद्योगपती, मोठे राजकीय नेते यांचा स्वार्थ आहे. कारण त्यांचे आर्थिक हितसंबंध यात गुंतलेले आहेत. कृषी, उद्योग, शिक्षण, आरोग्य, पाणी, वीज अशा महत्वपूर्ण बाबीचे खाजगीकरण करत आहोत. यांच्या किंमती जागतिक बाजारपेठेच्या निर्देशांकानुसार देतो, पण शेतकऱ्यांच्या उत्पन्न किंवा शेती उत्पादीत मालाला जागतीकीकरणातीलकिंमत मिळत नाही. शेतमालाचा उत्पादन खर्च वाढत जातो. पण शेतमालाच्याकिंमती तशा शेतकऱ्यांना मिळत नाहीत.

नगदी पीके घेण्यासाठी लागणारे उच्च दर्जाचे बीयाने, कीटक नाशक, रसायनिक खते, पाणी, वीज इ. प्रचंड खर्चामुळे उत्पादन खर्च खुप मोठया प्रमाणात वाढला आहे. त्याच बरोबर वाहतूक, मजूरी, व्याजाचे दर यामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. अशा परिस्थितीत मात्र शेतकत्याला शेतमालाची योग्य किंमत बाजारात मिळत नाही. मिळतेती उशिरा मिळतेत्यामुळे शेतकत्यांचा उदरनिर्वाह चालवणे अवघड होत जाते. त्यासाठीतो खाजगी सावकाराकडून व्याजाने पैसे घेतो व कर्जबाजारीपणाच्या चक्रात अडकतो. पिकांचा उत्पादन खर्च निघत नाही त्याला उत्पादन खर्चानेहोणारी वाढ जशी कारणीभूत आहेतशीचसरकारकडून जाहीरहोणारी किमान आधारभूत किंमतही आहे.

देशात खरोखर आयात कर ९०% व कापसावर १०% आयात कर लावला जातो. कापसावरील कमी असलेले १०% आयात कर वाढवून जास्त केला पाहिजेतर कापूस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांचा फायदाहोईल व मराठवाडयातील शेतकरी आत्महत्या वेगळे चित्र दिसून येईल.

महाराष्ट्राचे शेतकऱ्याकडे जिल्हासहकारी बँक व इतर बँकेचे कर्जाची थकबाकीचे प्रमाण पाहिलेतर राज्यातील शेती कर्जाची थकबाकी ही पश्चिम महाराष्ट्र २०-२१ हजार कोटी आहेतर मराठवाडयात केवळ २००० हजार कोटी आहे. एकूण थकबाकीच्या तुलनेत ७५% पश्चिम महाराष्ट्रसाखरपटयात आहे. १०% विदर्भात १५% थकबाकी आहे. शेतकऱ्यांच्या जास्त आत्महत्याहया कमी थकबाकी असणाऱ्या विभागातच होताना दिसून येतात. सरकारी धोरणाचा फायदाहा ज्या विभागात आत्महत्या जास्त होतात त्यांना कधीहोताना दिसत नाही.

कर्जाच्या थकबाकीला शेतकरीच जबाबदार आहेहे खरे नाही, कर्ज वाढताना शेतकरी विचार करतो की, कज काढून विहीर पाडू, विहीरीला पाणी लागेल त्यावर भाजी पाला पिकवू, इतर पीके घेऊ व त्यातून कर्जाची परतफेड

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College

करु परंतू कर्ज काढून जी विहीर पाडली जाते पंपासाठी विजेचे कनेक्शन वेळेवर मिळत नाही. मिळालेचतर त्या वीजेचा पुरवठाच नसतो. लोडशेंडींगचा सामना करावा लागतो. पाण्याविना पीके करत जातात. कनेक्शनाचा, मोटरीचा आणि पाईपलाईनचा खर्च वाढत जातो व शेतकऱ्याकडील कर्जाचेहप्ते. मराठवाडयातील शेतकरी कर्ज फेडण्याचा प्रयत्न करताततं शक्य होतं नसल्याने आत्महत्येचा मार्ग पत्कारतात.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या विदर्भात झाल्या असल्या तरी सध्या शेतकऱ्याच्या आत्महतेचे लोण मराठवाडयातील अनेक जिल्हयात पसरत आहे. नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, उस्मानाबाद, जालना, औरंगाबाद इ. जिल्हयात शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्याचे आढळून येत आहे. राज्य सरकार व केंद्रसरकार यांचे पॅकेज यांचा काही परिणाम झालेला नाही. कारण हे पॅकेजच शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या मुळ कारणांनाहातच घालत नाही. आत्महतेचे सत्र वाढतच चाललेले दिसत आहे.

**०.५ आत्महत्ये मागील कारणे.**

१) शेतकऱ्यांच्या आत्महत्या वर्गबाजारी पणा व नापिकी, दुष्काळीस्थिती, शेतमाला योग्य भाव मिळत नाही.

२) कर्जबाजारी पणा आणि आर्थिक तास शेतकऱ्यावर वाढत चाललेला आहे.

३) शेतमालाच्या उत्पादनात वाढ होत आहे. पण शेतमालाच्याकिंमतीतून उत्पन्नात वाढ होत नाही.

४) अन्नधान्य उत्पादनाच्या तुलनेत नगदी पीकांच्या उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याच्या आत्महत्यांचे प्रमाण ज्यास्त आहे.

५) मोठ्या प्रमाणात धोके स्विकारुन शेतकरी अन्नधान्य पीकांकडुन नगदी पीके घेण्याकडे शेतकरी कल वाढलेला दिसून येतो.

६) शेतमालाचा उत्पादन खर्च सतत वाढत चाललेला आहे.

७) शेती क्षेत्रातील उत्पादन घटकाच्या बीयाणे, औषधे, खते इ. वा किंमत वाढ बीयाणे बोगस निघाल्याने शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागतात.

८) शेतकाऱ्याकडे बघण्याचा सरकारचा दृष्टिकोन उदासीन आहे.

९) छोट्या आणि मध्यम स्वरुपाच्या शेतकाऱ्यांचेसंरक्षण करणारी कुठलाही यंत्रणा सक्षमपणे कार्य करत नाही.

१०) उत्पादन खर्च आणि हमीभाव बाजारातील दर यामध्ये मेळ नराहील्याने कर्जाचा बोजा शेतकऱ्यांवर वाढत जातो.

११) सरकारचे आयात - निर्यात धोरण शेतकऱ्याच्या विरुध्द दिसते.

१२) शेतीमध्ये प्रामुख्याने पावसावर अवलंबीत्व आहे. सिंचनाच्या पुरेशासोयी नसल्याने नगदीपीके घेणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जाचा मोठा फटका बसला व कर्ज फेडण्यासाठीसरकारला पुन्हा त्याच पीकाचासहारा घ्यावा लागतो. या दृष्टचक्रात शेतकरीसापडतो.

१३) शेतमाल विपणनासाठी विपण यंत्रणेच्या आधाराचा अभाव यंत्रणेचातृटी दिसून येतात.

१४) पावसाचा अनियमितपना व दुष्काळामुळे पीकाचे मोठया प्रमाणात नुकसानहोते.

१५) शेती उत्पादनाच्या साधनाच्या भरमसाठ किंमत, बी-बीयाने किंमत वाढ, वाढता उत्पादन खर्चात वाढ होते.

१६) सिंचनाच्या श्वाश्वत सोईचा अभाव असल्याने कोरडवाहू शेती करावी लागते.

**०.६ उपाय :-**

१) कृषी कर्जावरील व्याजदर कमी असावेत.

२) थकबाकीवरील चक्रवाढव्याज फक्त अशाच व्यक्तीकडून वसूल करावे जे परतफेडीची क्षमता असूनही थकबाकी भरायची टाळतात.

३) शेतकाऱ्याची अवस्था खरोखर दयनीय असेल अशा शेतकऱ्याच्या थकबाकीवर चक्रवाढ व्याज लावू नये.

४) सरकारने कृषी जोखीम निधी उभारायला हवा. नैसर्गिक आपत्तीचा पीकाला फटका बसेल. अशा शेतकऱ्याच्या कर्जावरील व्याज माफ करता येईल.

५) शेतमालाच्या विपणनासाठी पायाभूत सुविधाकरिता बॅंकांकडून पत पुरवठा उपलब्ध करुन देण्यात यावा.

६) वेळेवर कर्ज फेडणाऱ्या शेतकाऱ्याला बक्षीस देण्यात यावे.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

७) शेतमालाला योग्य व शाश्वत किंमत व्यवस्था निर्माण होणे आवश्यक आहे.

८) शेतकऱ्यांना शेकमालाची चांगलीकिंमत येईपर्यंत त्यांच्या शेतमालाची साठवणूक करण्यासाठी गोडावून वेअर हाऊसची उपलब्धता झाली पाहीजे.

९) उत्पादन खर्चावर आधारित कृषी मालाला भाव मिळाला पाहीजे.

**०.७ संदर्भ :-**


१) महेश शिरापरकर महाराष्ट्र वार्षिकी २०५०
'द युनिक ॲकॅडमी' पुणे.

२) शेतकऱ्यांच्या आत्महत्या चितण व उपाय नरेद्र लांजेवार.

३) अर्थसंवाद - जुलै - सप्टेंबर २०१५.

४) ncrb.nic.in. various reports of accidental &sucidal deaths in India National Crime Record, New Delhi.

५) Government of Maharashtra, sector of officer dept. of (farmer sucide) new, administrative building Mumbai.

६) दै. दिव्यमराठी ३,२०१७

७) दै. पुण्य - नगरी २०१७

8) https ://en.m. Wikipedia.org/wiki/farmers%27'suicides--in--India

9) http://www.thehindu.com/opinion/colums/yainth/farm-sucides-rise-in-maharashtra-statestillllears-the-lin-/amcu 3595351 ece.


Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad